# ज्ञान प्रबोधिनी

सौर चैत्र १९४७ चे मासिक वृत्त
सौर वैशाख १, शके १९४७
दि. २१/४/२०२५

★ ज्ञान प्रबोधिनीच्या तिसऱ्या भवितव्य लेखाचे 'विस्तार' हे साध्यसूत्र आहे. त्याची चार मार्गदर्शक तत्त्वे म्हणजे समावेशकता, नवोन्मेषता, सेतुबंधन व प्रभाव. त्या अनुषंगाने माहे सौर चैत्रचे मासिक वृत्त. ★

## प्रकट चिंतन

ज्ञान प्रबोधिनीच्या कामाचे वर्णन करताना 'धर्मविचार आणि ईशचिंतन यात सनातन्यांतील सनातनी; शास्त्र आणि उद्योगविचार यात आधुनिकांतील आधुनिक' असे आपण सांगतो. सर्वसामान्य समजुतीप्रमाणे धर्मविचार आणि शास्त्र (विज्ञान) ही दोन परस्परविरोधी टोके आहेत. ईशचिंतन आणि उद्योगविचार ही पण दोन परस्परविरोधी टोके आहेत. या दोन टोकांच्या मध्ये समाजासंबंधी विचार व संकल्पना येतात असे म्हटले, तर त्याबाबतीत प्रबोधिनी सनातन्यांतील सनातनी की आधुनिकांतील आधुनिक की काळाबरोबर राहणारी आहे?

गेली काही वर्षे शासकीय पातळीवर आणि अनेक सामाजिक संघटना संविधान दिन साजरा करतात. आजच्या युवकांनी संविधान, मूलभूत हक्क, मूलभूत कर्तव्ये हे शब्द बऱ्याच वेळा आणि अनेक ठिकाणी ऐकलेले असतात. प्रबोधिनीतील प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रमाच्या आधी एका युवकाने मला विचारले की संविधानातील मूलभूत कर्तव्ये आणि प्रबोधिनीतील प्रतिज्ञा ही दोन्ही सारखी आहेत की त्यांत काही फरक आहे?

मी त्याला सांगितले की संविधानातील मूलभूत कर्तव्यांपैकी दहावे कर्तव्य पुढीलप्रमाणे आहे. **'समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या उपक्रमांचा प्रारंभ करण्यात व ते पूर्ण करण्यात आपला देश सतत आघाडीवर राहावा यासाठी सर्व वैयक्तिक व सामुदायिक कामगिरीच्या क्षेत्रांत अत्युच्च यश मिळवण्यासाठी सतत झटणे'**. प्रबोधिनीच्या पहिल्या प्रतिज्ञेत असे सतत झटण्याचे व्रतच घ्यायचे असते. फक्त प्रबोधिनीच्या प्रतिज्ञेतील शब्द १९७४ मध्ये निश्चित झाले आणि संविधानात घटनादुरुस्ती होऊन १९७५ मध्ये मूलभूत कर्तव्यांचा समावेश झाला. हे ऐकून अनेक युवकांची मने आश्वस्त झाली.

युवकांच्या मनात शंका येतात तसे शालेय विद्यार्थ्यांच्या मनातही शंका असतात. भारतातील सर्व भाषांमधील पाठ्यपुस्तकांमध्ये १९६५ सालापासून राष्ट्रीय प्रतिज्ञा छापलेली असते. बहुतेक शाळांमध्ये परिपाठामध्ये सर्व विद्यार्थी ती रोज उच्चारतात. मी आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रताचे प्रास्ताविक व्याख्यान द्यायला गेलो, तर आवर्जून या प्रतिज्ञेचा उल्लेख करतो. त्यात एक वाक्य पुढीलप्रमाणे आहे. **'माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.'** देशातल्या परंपरांचा पाईक (म्हणजे सैनिक, रक्षण करणारा) होण्याची पात्रता अंगी यावी, म्हणून विद्याव्रत घ्यायचे आहे. पात्रता येण्यासाठी सदैव प्रयत्न करणे म्हणजे विद्याव्रतातील व्रते पाळणे. असे सांगितल्यावर सर्वत्र रूढ आहे ते आणि प्रबोधिनीतील विशेष यांची विद्यार्थ्यांच्या मनात संगती लागते.

समाजासंबंधी चिंतन करणाऱ्या अनेक व्यक्ती प्रबोधिनीशिवायच्या इतर संघटनांमध्ये व वैयक्तिकरित्या काम करत असतात व आपले विचार मांडत असतात. काही वेळा आपण त्यांच्याहून आधुनिक असू. काही वेळा आपले विचार इतरांना पारंपरिक वाटतील. काही वेळा समाजातील नव्याने पसरणारे विचार आपण तसेच्या तसे स्वीकारू. आपले काही विचार इतरांना वेगळे वाटले तरी आग्रहपूर्वक मांडत व कृतीत उतरवत राहू. समाजातील विविध विचारसरणी आणि नवीन नवीन संकल्पना यात आधुनिकांतील आधुनिक की सनातन्यांतील सनातनी की सद्यःकालीन विचारप्रवाहांच्या आणि भावधारांच्या बरोबर राहायचे, यावर सर्वांनीच सतत चिंतन करत राहिले पाहिजे.

– गिरीश श्री. बापट

- **नागरी वस्ती अभ्यासगट रामनवमी भजनोपासना** – पूर्व तयारी म्हणून दोन वेळा एकत्र जमून सामूहिक अभंग म्हणण्याचा सराव केला. सौर चैत्र १६ (६ एप्रिल) रोजी भजनोपासना झाली. त्याला २६ जणी उपस्थित होत्या. त्यातल्या १९ जणींनी अभंग म्हटले.
- **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर केंद्र पूर्व प्राथमिक विभाग :** सौर फाल्गुन २७ (१८ मार्च) रोजी आजी आजोबांसाठी योजलेली कार्यशाळा मानसतज्ज्ञ व समुपदेशक अलकाताई काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. कार्यशाळेला ६० जणांची उपस्थिती होती.
- **सोलापूर येथील पिशवी निर्मिती प्रकल्प सामाजिक उद्योजकता :** सन २०२४–२५ मध्ये पिशवी निर्मिती प्रकल्पातील महिलांनी एक कोटीची उलाढाल केली आहे. ४५ महिलांनी विडी काम पूर्णपणे सोडून पिशवी शिवण्याचे काम स्वीकारले आहे. विडी कामगार महिलांना तंबाखू पासून होणाऱ्या त्रास या प्रश्नावर उत्तर म्हणून या महिलांना आरोग्यदायी व आत्म सन्मानजनक व्यवसाय उपलब्ध करून देत सामाजिक उद्योजकतेचा एक नमुना उभा करावा या हेतूने पिशवी निर्मिती प्रकल्प व Prabodhan Women's Empowerment ही संस्था सुरू केली.
- **संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी) संकल्पपूर्ती कार्यक्रम** – संवादिनीच्या रौप्य महोत्सवी वर्षात केलेल्या मातृभूमिपूजनाच्या संकल्पपूर्तीचा कार्यक्रम सौर चैत्र ४ (२५ मार्च) रोजी प्रबोध सभागृहात संपन्न झाला.

  वर्षभरात एकूण १२४ मातृभूमिपूजन झाले. या कार्यक्रमात १२५वे मातृभूमिपूजन केले.

## ★ समावेशकता ★

### ❖ नागरी वस्ती अभ्यासगट

बालविकास प्रकल्पाची शोधबोध बैठक  झाली. मार्च अखेर प्रकल्प पूर्ण झाला. प्रकल्पामध्ये व्यक्तिमत्त्व विकासावर आधारित सत्रे घेतली व नेतृत्वगुण विकासावर अनेक कृतीसत्रे योजली होती. त्याचा मुलांना व शिक्षकांना चांगला उपयोग झाला. मुलांमध्ये अनेक बदल झालेले दिसून आले. वर्ग घेणाऱ्या शिक्षिकांनी स्वतःमध्ये झालेले सकारात्मक बदल सांगितले.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

मनोमापन विभागातर्फे सध्या समुपदेशन मार्गदर्शन विभागामध्ये ‘स्वप्न सहजीवनाचे’ या चाचणीचे इंग्लिश व मराठी गूगल फॉर्म तयार करून त्याचे गुणांकन एक्सेलमध्ये key तयार करून अहवालासाठी शाब्दिक व आलेख स्वरूपात माहिती संकलनाचे काम करून झाले आहे.

विविध चाचण्या भारतीय भाषांमध्ये व वेब वर उपलब्ध करून देण्याचे काम चालू आहे.

## ★ नवोन्मेषता ★

### ❖ नेतृत्व संवर्धन केंद्र

**अग्रदूत प्रकल्प –** सध्या प्रकल्पातील सहभागी विद्यार्थी हे सामाजिक प्रकल्प करत आहेत. या संदर्भात मागील महिन्यात खंडाळा आणि बारामती या ठिकाणी भेटी झाल्या. या महिन्यात शिबिरात निवड झालेल्या १०४ विद्यार्थ्यांची दूरस्थ बैठक झाली. पुणे जिल्ह्यात मातृभूमी परिचय सहल आणि गिरिभ्रमण सहल या प्रकल्पापेक्षा जास्तीच्या उपक्रमांची माहिती सांगितली.

## ★ सेतुबंधन ★

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

**उपेक्षित किशोर गट क्षमता विकास प्रकल्प (मेळघाट)** – मैत्री संस्थेबरोबर चालू असलेल्या प्रकल्पात अहवाल तयार करण्याचे काम चालू आहे. मैत्री संस्थेला मुलींची व मुलांची अशी वेगळी group profile करून हवी होती त्याप्रमाणे मुलींची group profile पाठवली आहे. मुलांचे group profile चे काम चालू आहे. तसेच सविस्तर अहवाल लिहिण्याचे काम चालू आहे.

एडीएम फाऊंडेशन कडून नवोन्मेश शाळा, चाकण येथील ७वी व ८वीतील निवडून घेतलेल्या चार मुलांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. Psychometric testing, teacher's rating, facilitator's rating या तिन्ही प्रकारे मुलांची निवड करून त्यांची नावे व निवडीसंदर्भात एक निवेदन तयार करून ते एडीएम फाऊंडेशनला पाठवले आहे.

**अभिक्षमता मापन चाचणी –** रोइंग व तेजू (अरुणाचल प्रदेश) येथे १५० विद्यार्थ्यांचे चाचणीकाम व मार्गदर्शन पूर्ण झाले.

## ★ प्रभाव ★

### ❖ ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

महाराष्ट्र राज्य शारीरिक शिक्षण समन्वय समिती व सहयोगी संघटनांतर्फे आयोजित दुसऱ्या राज्यस्तर शारीरिक शिक्षण शिक्षक महाक्रीडा अधिवेशनामध्ये मा. प्राचार्य मिलिंद नाईक यांनी ‘राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-शारीरिक शिक्षण’ या विषयावर मांडणी केली.

सृजन फाऊंडेशनचे  अभंग  इंग्लिश  मीडियम  स्कूल, श्रीक्षेत्र  देहू यांच्यातर्फे आयोजित शिक्षकांसाठी मार्गदर्शन शिबिरामध्ये मा. मिलिंदराव नाईक यांनी ‘नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी व कार्यपद्धती’ या विषयी मांडणी केली.

### ❖ शैक्षणिक साधन केंद्र

**प्रबोध आभासी प्रयोगशाळा** – चिंचवड, पुणे येथे असलेल्या सायन्स पार्कला नुकतीच ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र निर्मित प्रबोध आभासी प्रयोगशाळा देण्यात आली.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**निसर्ग मित्र ऑलिंपियाड** – निसर्ग मित्र ऑलिंपियाड या स्पर्धेत शहरी आणि ग्रामीण भागातील एकूण ५४६५ विद्यार्थी सहभागी झालेले आहेत. बहुपर्यायी प्रश्नांची पहिली फेरी ४०९३ विद्यार्थ्यांनी पूर्ण केली आहे. यांपैकी २१९४ विद्यार्थ्यांनी निरीक्षणावर आधारित दुसरी फेरी पूर्ण केली आहे. तिसरी प्रकल्प फेरी सुरू आहे. या फेरीसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे.

### ❖ शैक्षणिक उपक्रम संशोधिका

**गणित प्रभुत्व परीक्षा** –  गणित प्रभुत्व स्पर्धा २०२४-२०२५ चा बक्षीस समारंभ सौर चैत्र २४ (१४ एप्रिल) रोजी झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. योगेश देशपांडे (प्राध्यापक, माहिती-तंत्रज्ञान विभाग, व्ही.आय.आय.टी पुणे) हे उपस्थित होते. एकूण ७० विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल शिक्षक, पालक यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

### ❖ प्रज्ञा मानस संशोधिका

लग्न ठरलेल्या किंवा जोडीदार ठरलेल्या जोडप्यांसाठी ‘साथ तुझी माझी’ ही विवाहपूर्व तयारीची दोन दिवसीय कार्यशाळा दूरस्थ पद्धतीने घेतली. या कार्यशाळेत नात्यांमधील संवादाचे महत्त्व, विवाहोत्तर लैंगिक संबंध, विवाहातील परस्परपूरकता, विवाहानंतरचे आर्थिक

व्यवस्थापन, कौटुंबिक जबाबदारी आणि व्यक्ती स्वातंत्र्य यांचे संतुलन अशी सत्रे घेण्यात आली. एकूण पाच जोडपी आणि एक विवाहेच्छुक युवती यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला.

**संतुलन ओम मेडिटेशन परिणामकता प्रकल्प** – प्रदत्त संकलन रावेत व पुणे या भागातून केले गेले. त्याचे Pre-test, Interim व Post-Test असे दोन्ही गटाचे चाचणीकाम झाले आहे व डेटा एंट्रीचे काम पूर्ण झाले आहे. सध्या जर्मनीवरून आलेल्या डेटाची एंट्री सुरू आहे.

**महिंद्रा आणि महिंद्रा, चाकण** कंपनीमधील महिला कामगारांसाठी 'यशस्विनी' हे प्रशिक्षण एकूण सहा दिवस झाले. या प्रशिक्षणात work ethics (quality, safety, discipline, punctuality, team work, respect), POSH, grievances handling process यासाठी awareness, personal aspiration and their importance असे विषय घेण्यात येत आहेत. एकूण संख्या : २१४.

**सिग्मा इंजिनिअर प्रायव्हेट लिमिटेड, चाकण** यांच्या टीम लीडर या पदासाठीचे ७६ जणांचे चाचणी काम झाले.

## ★ विभागांचे चालू कामाचे वृत्त ★

### ❖ नेतृत्व संवर्धन केंद्र

**प्रशासकीय नेतृत्वगुण विकसन वर्ग–** जिज्ञासा १९ वर्ग – संपूर्ण वर्षभर झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित अंतिम परीक्षा घेण्यात आली. यामध्ये एकूण चार प्रकारच्या परीक्षा घेण्यात आल्या. अंतिम परीक्षेच्या कालावधीत वर्षभरात झालेल्या फाऊंडेशन व प्रिपरेटरी भागावर आधारित मुलाखती घेण्यात आल्या. एकूण ३१ विद्यार्थ्यांनी या मुलाखती दिल्या असून, प्रिपरेटरी भागाच्या मुलाखती अध्यापकांनी घेतल्या. यात प्रामुख्याने अभ्यास सवयी, झालेले NCERT पुस्तक वाचन व काही अभ्यासक्रमावरील प्रश्न विचारण्यात आले.

**आकांक्षा ११ वर्ग** – संपूर्ण वर्षभर झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित अंतिम परीक्षा घेण्यात आली. अंतिम परीक्षेच्या कालावधीत वर्गातील एकूण आठ विद्यार्थ्यांनी गटशः प्रबोधिनीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेतल्या. यामध्ये प्रामुख्याने त्यांचा आजपर्यंतचा प्रवास, कामाची पद्धत व नेतृत्व कौशल्यांचा वापर इ. विषयांवर प्रश्न विचारले गेले.

**पालक बैठक व वर्षांत समारंभ –** सौर चैत्र ३ (२४ मार्च) रोजी केंद्रात या वर्षी वर्गात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांची प्रत्यक्ष बैठक प्रबोधिनीमध्ये आयोजित केली होती. तसेच केंद्राची वर्षांत उपासना व त्यासोबत अल्पोपहार आयोजित केला होता. दोन्ही वर्गातील मिळून एकूण ४७ पालक राज्याच्या विविध जिल्ह्यांतून बैठकीला आले होते. समारंभासाठी स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माजी विद्यार्थिनी मा. अस्मिता नरके-पाटील (अतिरिक्त जिल्हाधिकारी) या उपस्थित होत्या.

### ❖ नैसर्गिक संसाधने विभाग

**पाणी साठवण टाकी बांधकाम** : पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील घिसर (ढेबेवस्ती) येथे दहा हजार लिटर क्षमतेच्या पाणी साठवण टाकीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले.

- नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यातील पूर्ण झालेली टाकी – सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील रेडे गावातील ईजाळवस्ती (कोळेकरवस्ती) आणि फडतरी गावातील पाटीलवस्ती व शिवारवस्ती येथे साठवणटाकीच्या सळईचा सांगाडा बांधण्याचे काम ग्रामस्थांच्या सहभागातून नुकतेच पूर्ण करण्यात आले. त्यासाठी गावातील महिला व पुरुषांनी श्रमकार्य केले. अशाच प्रकारे नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यातील तोंडवळ ग्रामपंचायतीतील शिदमाळ आणि आडगाव ग्राम पंचायतीतील उंबरपाडा येथे आणि गावठाणातील वरच्या वाडीतही सांगाडा बांधण्याचे काम ग्रामस्थांच्या सहभागातून पूर्ण करण्यात आले.

सातारा जिल्ह्यातील सातारा तालुक्यातील पारंबे गावातील २० हजार लीटर क्षमतेच्या टाकीच्या लोकार्पणाचा कार्यक्रम साताऱ्याचे गट विकास अधिकारी सतीश बुद्धे व केपीआयटीचे अधिकारी रविराज दामले यांच्याहस्ते झाला.

### ❖ स्पर्धा परीक्षा केंद्र

**Complete Batch २०२४-२५** आणि **यूपीएससी पूर्वपरीक्षा २०२५ Test Series Batch** : या वर्गाच्या दुसऱ्या टप्प्यातल्या भूगोल, पर्यावरण या विषयांच्या आणि दोन एकत्रित (Comprehensive - GS + CSAT) बहुपर्यायी पद्धतीच्या सराव चाचण्या झाल्या. 'सराव परीक्षांचे विषयवार सखोल विश्लेषण' यावर वा. सविता कुलकर्णी यांचे सत्र झाले.

**यूपीएससी final Phase Test Series** - यूपीएससी पूर्व परीक्षेच्या दृष्टीने पुरेसा सराव व्हावा म्हणून आपल्या विभागाचा मागील सहा वर्षांपासून सुरू असलेला एक चांगला उपक्रम म्हणजे "Final Phase Test Series." विविध क्लासेसच्या उपलब्ध असलेल्या आणि आपल्या अध्यापक आणि अधिमित्रांनी सोडवून सुचवलेल्या उत्तमातील उत्तम Comprehensive Test चे नियोजन आपण करतो. आत्तापर्यंत तीन चाचण्या झालेल्या असून १११ विद्यार्थ्यांनी किमान एक चाचणी सोडवलेली आहे. Co-Apt Testing Counselling – नेतृत्व साधना केंद्र, रायपुर येथील ९१ विद्यार्थ्यांची Co-Apt चाचणी झाली. या सर्वांचे अहवाल तयार करून विद्यार्थ्यांना पाठवून आत्तापर्यंत पाच विद्यार्थ्यांचे दूरस्थ समुपदेशन वा. सविता कुलकर्णी यांनी घेतले. तसेच अरुणाचल प्रदेश मधील चार विद्यार्थ्यांचे दूरस्थ समुपदेशन डॉ. कौस्तुभ बोंद्रे यांनी घेतले.

**विशेष सत्र** – सौर फाल्गुन २४ (१५ मार्च) रोजी डॉ. नितीन कुलकर्णी, IAS, Additional Chief Secretary to the Governor of Jharkhand, आणि त्यांच्या पत्नी सौ. सुमन गुप्ता IPS, ADG Training and Modernisation, झारखंड, यांनी ज्ञान प्रबोधिनीला भेट दिली.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

❖ **ज्ञान प्रबोधिनी सोलापूर केंद्र**

छोट्या गटातील मुलांसाठी गंमत खेळाचे नियोजन करण्यात आले. ७१ विद्यार्थ्यांनी साहित्य हाताळणीचा अनुभव घेतला. विषयानुसार हस्त-मुक्त-चित्र, कारक विकास, इंद्रिय जीवन व्यवहार इ. विषयांची ८० खेळांची मांडणी करण्यात आली होती. भाषा विषयाचे २४, गणित १६, इंद्रिय विकास २० व कारक खेळासाठी ३० अशा एकूण ९० साहित्यांची मांडणी केली होती.

**प्राथमिक विभाग :** इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे इंग्रजी व संस्कृत संभाषण, दशांश गीतेतील काही श्लोक, योगासने, सायन्स लॉ या सर्व विषयांचे सादरीकरण इयत्ता पहिलीचे पालक तसेच प्रबोधिनीचे संचालक आदरणीय गिरीशराव बापट यांच्यासमोर झाले. सादरीकरणानंतर आदरणीय संचालकांनी अध्यापक, पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**माध्यमिक विभाग :** आंतरशालेय पुस्तक परिचय स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ झाला. सतरा शाळांमधून इयत्ता पाचवी ते दहावीतील १५० विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. यावेळी पारितोषिक प्राप्त स्पर्धकांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

**युवक विभाग** – गुढीपाडव्याच्या दिवशी राष्ट्रयोगिनी कै. वाच. स्वर्णलताताई भिशीकर यांच्या राष्ट्रसमर्पित जीवन चरिताचे स्मरण – गच्चीवर भगव्या ध्वजाचे आरोहण, ध्वजगीत व ध्वजनमस्ते झाले. उपासना मंदिरात उपासना, वाचन, पद्य, कै. लताताई जीवन दर्शन चलचित्र व व्याख्यान असा कार्यक्रम झाला. 'डॉ. स्वर्णलताताई भिशीकर – एक राष्ट्र समर्पित जीवन' असा व्याख्यानाचा विषय होता. श्री. रोहन पुल्ली यांनी त्यांचे पुणे येथील कार्य, विश्वस्त सी. ए. श्री. श्रीरंग कुलकर्णी यांनी सोलापूर येथील कार्य व डॉ. अपर्णाताई कल्याणी यांनी त्यांचे हराळी येथील कार्य व त्यांचे गुण हे त्यांच्या जीवनातील प्रसंगातून सांगितले. एकूण सुमारे २५० जण उपस्थित होते.

❖ **संवादिनी (स्त्री-शक्ती प्रबोधन, शहरी)**

**मासिक बैठक गट –** मार्चच्या मासिक बैठकीची सुरुवात आ. लताताईंना श्रद्धांजली वाहून झाली. यानंतर 'स्वातंत्र्य' हे मूल्य केंद्रस्थानी ठेवून संकलित केलेल्या निवडक मराठी साहित्याचे 'नितळ निळ्या आकाशाखाली' या नावाने अभिवाचन झाले. सई लिमये, गौरी देशपांडे आणि गंधार जोशी यांनी सादरीकरण केले. एप्रिल महिन्याची मासिक बैठक दूरस्थ पद्धतीने झाली. मा. चिन्मयीताई मुळे यांनी 'पंचसूत्री आणि अहिल्याबाई' या विषयावर कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, समरसता, नागरी आयाम, स्वदेशी या मुद्द्यांना धरून अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र मांडले. उपस्थिती १०० होती.

**संवादिनी शिरूर** – हर्दे हॉस्पिटलमध्ये संवादिनीसाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून दिली. 'स्त्री-विश्व' या विषयावरील कवितांचे सादरीकरण झाले. २५ जणींनी विविध कविता सादर केल्या.

❖ **शैक्षणिक साधन केंद्र**

**माध्यम केंद्र –** Gender Sensitization Course – केंद्र सरकारच्या Capacity Building Commission साठी 'Gender at Workplace' या विषयावरील अभ्यासक्रमाची निर्मिती प्रज्ञा मानस संशोधिकेतर्फे केली जात आहे. त्यातील इंग्रजी भाषेतील सहा भागांचे संकलन या महिन्यात पूर्ण झाले. पुणे नगरवाचन संस्थेसोबत मराठी भाषा अध्ययनासाठी चित्रफीत निर्मिती प्रकल्प सुरू आहे. त्या अंतर्गत तीन विषयांवरील चित्रफितींचे छायाचित्रण व संकलन पूर्ण करण्यात आले.

- **आनंदी शिक्षण प्रकल्प –** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

❖ **शैक्षणिक उपक्रम संशोधिका**

**प्रज्ञा विकास प्रकल्प (पाच केंद्र)** – प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांसाठी वार्षिक परीक्षा पूर्वतयारी सत्रे व स्वयं-अध्ययन कौशल्याचे तास घेण्यात आले. विद्यार्थ्यांसाठीच्या सराव परीक्षा आयोजनामध्ये १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

**विकासमित्र प्रकल्प** – प्रथमच इ.१०वी च्या प्रज्ञाविकास (निवडक विद्यार्थी) विद्यार्थ्यांसाठी व इच्छुक मुलांसाठी सौर फाल्गुन २९ (२० मार्च) रोजी एक दिवसीय सहलीचे आयोजन ज्ञान प्रबोधिनी वास्तू, टिळक रोड येथे करण्यात आले. सहलीत ४६ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सत्रांमध्ये कार्यशाळा, सुतारकाम, VR, Chatgpt ,Electronics आणि पुढील नियोजन यासाठी मार्गदर्शन देण्यात आले. ही सत्रे विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त व प्रेरणादायी ठरली. मुलांना छावा चित्रपट दाखवून त्यावर गटचर्चा घेण्यात आली.

❖ **ज्ञान प्रबोधिनी निगडी केंद्र**

**पूर्व प्राथमिक विभाग कारक कौशल्य आधारित खेळांचे सादरीकरण** – शारीरिक विकासाबरोबर मानसिक आणि भावनिक विकासासाठी रोजचा खेळ अत्यंत महत्त्वाचा असतो. म्हणूनच सौर चैत्र ८ (२९ मार्च) रोजी पूर्व प्राथमिक विभागात मुलांच्या स्थूल स्नायूंच्या विकासासाठी कारक कौशल्याधारित खेळांचे सादरीकरण आयोजित केले होते.

- **गुरुकुल मातृभूमी परिचय शिबिर –** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**वर्षांत समारंभ** – संपूर्ण केंद्राचा वार्षिक आढावा घेऊन त्याची सुयोग्य मांडणी करण्यासाठी या वर्षी निगडी केंद्राच्या वर्षांत समारंभात निवडक विषयांची मांडणी झाली. यात प्रामुख्याने कुटुंब संस्कृती वर्षानिमित्त झालेले उपक्रम, नव्याने झालेले मोठ्या स्वरूपातील उपक्रम अशा उपक्रमांचा समावेश होता.

**प्रकल्प सादरीकरण** – गुरुकुल विभागात दोन टप्प्यांत विद्यार्थ्यांचे वार्षिक प्रकल्प सादरीकरण झाले.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

## अभिनंदन

- डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालयाला एकूण तीन पदके प्राप्त झाली. काव्या कुलकर्णी गुरुकुल विभाग, सुवर्ण पदक, शिवराज निरवे गुरुकुल विभाग, रजत पदक, मीरा काळे पूर्व माध्यमिक विभाग, कांस्य पदक.
- इस्कॉन तर्फे घेण्यात आलेल्या भगवद्गीता प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये इयत्ता १०वी ब मधील शर्वरी गुर्जर हिला आठवी ते दहावीच्या गटात द्वितीय क्रमांकाचे बक्षीस म्हणून सायकल मिळाली व इतर सर्वांना पदके मिळाली.
- मा. प्राचार्या सौ. विद्या उदास यांना 'आदर्श मुख्याध्यापक' पुरस्कार मिळाला.

### ❖ डोंबिवली विस्तार केंद्र

**प्रबोधक मंडळ (शहरी विभाग) टिळक नगर शाळा** – टिळक नगर प्रबोधक मंडळाचे एक दिवसीय शिबिर वांगणी येथे झाले. उन्हे नव्हती म्हणून चालतच मुलांना ठरलेल्या ठिकाणी घेऊन गेलो. घोषणा देत गाणी म्हणत मुलांनी पदयात्रेचा आनंद लुटला. पद्याने सुरुवात करून परिसर निरीक्षण, मारुती स्तोत्र व हनुमान चालीसा एकत्रित म्हणून मारुतीचे गुणविशेष शोधून काढले व चर्चा केली. हस्तकौशल्ये व खेळाचे सत्र झाल्यावर जेवण झाले. नंतर मौन संवाद, खेळ झाल्यानंतर परतीच्या प्रवासाला लागलो. डोंबिवली स्टेशनवर सर्व पालक आमची प्रतीक्षा करत होते. मुलांना त्यांच्या ताब्यात दिल्यानंतर एकदिवसीय शिबिर सहर्ष संपन्न झाले.

**पोरोहित्य विभाग –** पोरोहित्य विभागातर्फे वृत्त कालावधीत एकूण १०२ संस्कार करण्यात आले.

### ❖ बदलापूर संपर्क केंद्र

**हिरकणी –** सौर चैत्र १० (३१ मार्च) रोजी हिरकणी उपक्रमातील माता पालकांचे चौथे प्रशिक्षण सत्र झाले. सौर चैत्र २६ (१६ एप्रिल) रोजी अनुक्रमे पुणे व वेल्हे येथून येऊन, सौ. तृप्तीताई व सौ. कीर्तीताई यांनी बदलापूरमधील हिरकणी उपक्रमात सहभागी असलेल्या सात कार्यकर्त्यांना प्रशिक्षण दिले.

### ❖ चिपळूण स्थायी संपर्क केंद्र

**क्रीडाकुल ग्रामीण खेळाडू विकसन** प्रकल्पांतर्गत या वर्षातील अंतिम मैदानी व आरोग्य चाचणी झाली. या चाचणीमध्ये चिपळूण केंद्राच्या पाचही उपकेंद्रांमधील एकूण २७० खेळाडूंनी सहभाग घेतला. या चाचण्या घेण्यासाठी निगडी केंद्रातील सदस्यांसोबत चिपळूण केंद्रातील समन्वयक, कोच व प्रशिक्षक तसेच वैद्य उपस्थित होते.

चिपळूण तालुक्यातील न्यू इंग्लिश स्कूल, आंबडस या शाळेत ''हिरकणी'' चे समारोप सत्र सौर चैत्र २४ (१४ एप्रिल) रोजी झाले. ह्या सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संस्कार व्हॅली हायस्कूल खेर्डीचे मुख्याध्यापक श्री. भावसार व संस्थेचे अध्यक्ष श्री. निर्मळ उपस्थित होते. हे सत्र मार्गदर्शक सौ. स्वाती मुसळे यांच्यासोबत प्रशिक्षक सौ. अंकिताताई घोरपडे व श्रीमती स्मिताताई जागुष्टे यांनी घेतले. प्रशिक्षक, प्रतिसादी, नियमित उपस्थित असणाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे दिली. तीन हिरकणी मातांनी मोजक्याच शब्दात छान मनोगत व्यक्त केले.

सौर चैत्र २४ (१४ एप्रिल) रोजी श्री. पराग लघाटे यांनी चिपळूण केंद्र कार्यालयात भोम शाळेतील उत्सुक विद्यार्थिनींचे ''छोटे कलाकार'' या उपक्रमांतर्गत पद्य गायनावर सत्र घेतले.

### ❖ स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

**Lyondell Basell company** ची वेल्हे केंद्र भेट – सौर चैत्र १५ (५ एप्रिल) या दिवशी या कंपनीच्या शितल जन्नू, रुपेश उबाळे, पार्थ संगोई या तिघांनी व जेपीएफचे रजत जोशी यांनी केंद्र भेट दिली. मागील तीन वर्षांपासून या कंपनीने आनंद शाळा हराळी, तंत्रनिकेतन शिवापूर आणि संगणक वर्ग वेल्हे अशा प्रकल्पांना आर्थिक मदत केली आहे. वेल्हे केंद्रात सुरू असलेल्या खालील उपक्रमांना त्यांनी भेटी दिल्या.

**धानेप** – खेळत्या भांडवलातून डाळीची गिरणी घेऊन उद्योग करत असणाऱ्या सुरेखा धिंडले यांना भेट दिली.

**नवचेतना बैठक –** या बैठकीला येणाऱ्या गाव प्रतिनिधी तायांबरोबर कामाच्या गप्पा झाल्या.

**संगणक वर्ग समारोप** – मागील वर्षभरात झालेल्या MS Office व Basic Computer course च्या विद्यार्थ्यांना कंपनीच्या सदस्यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम झाला. याचबरोबर LearnEng आणि आरोग्य तपासणी या प्रकल्पांचे निवेदन झाले.

**आरोग्य प्रकल्पांतर्गत ज्येष्ठ नागरिक मेळावा –** वेल्हा येथे सहनिवासात दिवसभराचा मेळावा झाला.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

### ❖ ग्राम प्रबोधिनी साळुंब्रे

**कार्यशाळा व सन्मान** – सौर चैत्र १ (२२ मार्च) रोजी LEIGHTON संस्थेतर्फे व मेन्सा उपक्रमांतर्गत विद्यालयातील गिफ्टेड मुलांची कार्यशाळा घेण्यात आली. संस्थेचे श्री. मनीष यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व विद्यालयास उत्तम कामगिरीबद्दल सन्मानपत्र दिले.

**हिरकणी प्रकल्प :** सौर चैत्र ७ (२८ मार्च) या दिवशी प्रकल्पाची दूरस्थ बैठक घेण्यात आली. या बैठकीत सुवर्णाताईंनी मागील वर्षाचा हिरकणी आढावा विचारून त्यावर पुढील वर्षामध्ये कशा पद्धतीने कार्य करू शकाल याविषयी मार्गदर्शन केले. तृप्तीताईंनी हिरकणी सत्र व साळुंब्रे केंद्रामध्ये स्थानिक पातळीवर कार्याचा कसा विस्तार करू शकतो याबाबत चर्चा घडवून आणली.

**''मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा'' टप्पा दोनचे तालुकास्तरीय मूल्यमापन पूर्ण झाले. यामध्ये ग्राम प्रबोधिनी विद्यालयाला तालुक्यात तृतीय क्रमांक प्राप्त झाला. १ लक्ष रु. रोख रक्कम विद्यालयास बक्षीस म्हणून प्राप्त झाले.**

## ❖ कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर

**LMS ची बांधणी :** आपल्या शिवापूर केंद्रातर्फे भविष्यामध्ये दूरस्थ अभ्यासक्रम घेता यावेत असे उद्दिष्ट आपण मांडलेले आहे. त्याला समोर ठेवून LMS (Learning Management System) या प्रणालीची उभारणी या महिन्यामध्ये प्राथमिक स्वरूपात सुरू झाली. सर्व आपल्या केंद्रातच तयार केले आहे व आपल्याच वेबसाईटवर Host ही केले आहे. पहिला प्रयोग म्हणून बेसिक संगणक अभ्यासक्रम हा बारा आठवड्यांचा अभ्यासक्रम LMS वर अपलोड केला आहे.

**मणिपूर दूरस्थ प्रशिक्षण :** मणिपूर मधील Tamenglong येथे दुसरा संगणक प्रशिक्षण वर्ग सुरू झाला.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

**कमवा व शिका योजना :** वेल्डिंग तुकडीमधील विद्यार्थ्यांनी श्री प्रेस वेळू येथे एक्झॉस्ट फॅन फिटिंग, कॉम्प्रेसर करता शेड, वेल्हे येथे ध्वजस्तंभ व श्री प्रेस वेळू यांचे स्पॉट वेल्डिंगचे काम त्याचप्रमाणे लेथ मशीन शॉप मध्ये केबल ट्रे वेल्डिंग करणे ही कामे केली आहेत. स्पॉट वेल्डिंगचे आत्तापर्यंत आपण ११,३०० जॉब तयार करून दिले आहेत. त्यातून काही विद्यार्थ्यांनी त्यांचे शुल्क पूर्ण केले आहे.

## ❖ छात्र प्रबोधन

**प्रबोधन दूत मासिक बैठक :** सौर चैत्र २५ (१५ एप्रिल) रोजी दूरस्थ मासिक बैठकीत प्रामुख्याने विद्यार्थ्यांसाठी सुट्टीतील उपक्रम आणि नवीन प्रबोधन दूत नोंदणी याविषयी चर्चा झाली. एकूण ३५ प्रबोधन दूत या बैठकीसाठी उपस्थित होते. मे-जून महिन्यातील शिबिरे ज्ञान प्रबोधिनी निगडी येथे आयोजित करण्यात येणार आहेत. तपशील पुढीलप्रमाणे ----

- ✻ **प्रबोधन दूत निवासी शिबिर** - ३ ते ५ मे
- ✻ **विद्यार्थ्यांसाठी निवासी लेखन - अभिवाचन कार्यशाळा** ६ ते ९ मे
- ✻ **शिक्षक नेतृत्व शिबिर** - ५ ते ९ मे
- ✻ **झेप ६ ची नोंदणी आणि शिबिर** जूनच्या शेवटच्या आठवड्यात साधारण तीन दिवस.

## ❖ बोरीवली विस्तार केंद्र

**बोरीवली संवादिनी द्विदशक पूर्ती** - बोरीवली संवादिनी गटाचा विसावा वर्धापन दिन सौर चैत्र २४ (१४ एप्रिल) रोजी साजरा झाला.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

## ❖ विस्तार कार्य

अमरावती येथे शाश्वत कन्सेप्ट स्कूल या शाळेत प्रकल्प-प्रशिक्षणाचा पुढचा टप्पा सौर चैत्र २१ (११ एप्रिल) रोजी झाला. वर्षभर मुलांनी संशोधनात्मक प्रकल्प करावेत याची पायाभरणी चालू आहे. तसेच अमरावतीत स्थानिक गटाद्वारे विज्ञान दले सुरू व्हावीत यासाठीचीही पूर्वतयारी या दिवशी चालू झाली.

नाशिक येथे विद्याव्रत संस्काराची पूर्वतयारी चालू असून, त्यासाठी नियोजन व प्रशिक्षण बैठका नियमितपणे चालू आहेत. तसेच सौर चैत्र २७ (१७ एप्रिल) पासून मुलांसाठी पूर्वतयारी सप्ताह सुरू झालेला आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागात विस्ताराचे काम करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांची बैठक सौर चैत्र २३ (१३ एप्रिल) रोजी हराळी केंद्रात झाली. या बैठकीला हराळी केंद्रातील सात सदस्य प्रत्यक्ष, एक दूरस्थ, अंबाजोगाई केंद्रातून तीन सदस्य व विस्तार क्रियान्वयन समितीचे दोन सदस्य उपस्थित होते. तसेच, अमरावती जिल्ह्यात विस्ताराचे काम करू इच्छिणारे चार सदस्यही या बैठकीला उपस्थित होते. बैठकीत तीन सत्रे झाली त्यात निवेदने, विस्तारक्षम उपक्रम व स्थानिक संयोजक गट तयार करणे - स्थिर करणे यावर चर्चा, स्थानिक गटाच्या पुढाकाराने प्रबोधिनीचे काम करत असताना समाजाची गरज कशी ओळखावी याचे कार्यशाळा वजा सत्र झाले.

## ❖ ज्ञान प्रबोधिनी, हराळी केंद्र

**शेती :** सौर चैत्र १३ (३ एप्रिल) रोजी २५.४ मि.मी पाऊस झाला. यामुळे आंबा आणि इतर फळबागांना चांगला दिलासा मिळाला. सर्व रब्बी पिकांची काढणी पूर्ण करून नांगरणी झाली. सध्या आंबा चांगल्या स्थितीत असून एप्रिल अखेर काढणीला सुरुवात होईल.

**प्रदेश विकसन :** उमरगा येथील टाकीचा लोकार्पण सोहळा पार पडला. द. जेवळी व शिवनगर येथे स्थानिक समन्वयकांची मासिक बैठक झाली. पांढरी व उदतपुर येथे प्रतिसादी व्यक्तिंच्या बैठका झाल्या. आरोग्य प्रकल्प अंतर्गत दुर्धर रुग्णांना पुढील साहित्यांचे वाटप करण्यात आले. Wheel Chairs ६ नग, Walkers ८ नग, Walking support stick १० नग, Tilting beds ३ नग.

**स्त्री-शक्ती प्रबोधन :** शिवनगर, नरखोरी, रामतीर्थ सेवालाल नगर, इंदिरा नगर, गांधीनगर, जखनी या सहा तांड्यांमधून आणि तोरंबा, करवंजी, धानोरी, उदतपूर, सालेगाव, कोराळ, तावशीगड, हिप्परगा, दक्षिण जेवळी, माळेगाव या दहा गावांतून किशोरी विकास प्रकल्पामध्ये या वर्षी सहभाग होता. हराळी केंद्रात सौर चैत्र २ (२३ मार्च) रोजी सर्व मुलींसाठी किशोरी विकास मेळावा घेण्यात आला. गटकार्यातून आत्मविश्वास वाढेल व स्वतःबद्दल नवीन कळेल, अनोळखी व्यक्तींशी ओळख व मैत्री करून घेण्याची संधी मिळावी या उद्देशाने हा मेळावा घेण्यात आला. किशोरी विकास मेळाव्यासाठी २७० किशोरी व ३० युवती अशा एकूण ३०० जणी उपस्थित होत्या.

**युवक विभाग :** युवक विभागातील नुकतीच १०वीची परीक्षा दिलेले नवयुवक १३ जण आणि ४ मार्गदर्शक दादा अशा १७ जणांचा कन्याकुमारी अभ्यास दौरा झाला.

- सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.
- **पूर्व प्राथमिक विभाग :** सविस्तर वृत्त छायाचित्राला जोडले आहे.

(पान क्र. ७ व ८ या पानांवरील छायाचित्रांना त्यासंबंधीचे वृत्त जोडले आहे. छायाचित्राला स्पर्श केल्यास वृत्त वाचता येईल.)

✧✧✧

# सौर चैत्र १९४७ मधील प्रकाशचित्रे



आनंदी शिक्षण -रायगड सहल



ज्ञान प्रबोधिनी हराळी, युवक विभाग - कन्याकुमारी अभ्यासदौरा




स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) - ज्येष्ठ नागरिक मेळावा



नैसर्गिक संसाधने विभाग-पारंबे येथील टाकी उद्घाटन कार्यक्रम (सातारा)



टाकी लिंपण्यासाठी श्रमदान करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील आदिवासी महिला




आभासी प्रयोगशाळा उद्घाटन-सायन्स पार्क



स्पर्धा परीक्षा केंद्र - विशेष व्याख्यान



ज्ञान प्रबोधिनी, निगडी - कारक कौशल्य विद्यार्थी सादरीकरण



विकासमित्र (प्रज्ञा विकास) १०वी विद्यार्थी सहल क्षणचित्र



बोरीवली संवादिनी द्विदशकपूर्ती



गणित प्रभुत्व स्पर्धा बक्षीस समारंभातील क्षणचित्र



नागरी वस्ती अभ्यासगट - रामनवमी भजनोपासना



ज्ञान प्रबोधिनी हराळी : स्त्री-शक्ती प्रबोधन




कौशल्य प्रशिक्षण केंद्र, शिवापूर - मणिपूर दूरस्थ प्रशिक्षण



ज्ञान प्रबोधिनी निगडी - गुरुकुल मातृभूमी परिचय शिबिर



ज्ञान प्रबोधिनी हराळी - पूर्व प्राथमिक